बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दि ०५ मार्च २०२४

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १०७/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०४/०३/२०२४ रोजी २०.३० वा चे सुमारास फिर्यादीचे माहेरी ब्लॉक नं ०२ श्रेयशनगर म्हाडा कॉलनी जुळे सोलापूर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०५/०३/२०२४ रोजी १५.०६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ स्मिता अरविंद शितोळे,वय-३८ वर्षे,रा- सी/१,प्रियदर्शनी रेसीडेन्सी दमाणीनगर सध्या रा-ब्लॉक नं ०२ श्रेयशनगर म्हाडा कॉलनी जुळे सोलापूर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अरविंद आनंदराव शितोळे (पती), २) सुशिलकुमार आनंदराव शितोळे (दीर),३) लक्ष्मीबाई आनंदराव शितोळे (सासू) ४) आनंदराव शंकरराव शितोळे (सासरे),सर्व रा- सी/१,प्रियदर्शनी रेसीडेन्सी दमाणीनगर,सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,दि ०४/०३/२०२४ रोजी २०.३० वा च्या सुमारास फिर्यादीचे आई वडीलांचे घरी माहेरी फिर्यादीच्या मुलगी अन्विता हिचे वाढदिवस साजरा करण्यासाठी फिर्यादीचे पती,सासू सासरे आले होते. वाढदिवस साजरा केल्यानंतर फिर्यादीचे पती,दीर,सासू व सासरे हे फिर्यादीचे माहेरी येवून पुर्वी झालेल्या घटनाचे विषय काढून तू कोर्टामध्ये दाखल केलेले दावे माघारी घे असे म्हणून शिवीगाळ करून मारहाण करून तुझे तुकडे तुकडे करतो तुला खल्लास करतो अशी धमकी दिली फिर्यादीचे वडील भांडण सोडविण्याकरीता मध्ये आले असता त्यांनादेखील लाथाबुक्यांनी मारहाण करून घराबाहेर जावून घरासमोर पडलेली एक लाकडी काठी हातात घेवून येवून फिर्यादीस सर्वांगास मारहाण केली तसेच डाव्या डोळयाच्या बाजूस काठीने मारहाण करून जखमी केले आहे.म्हणून.तपास- पोहेकॉ/११९५/बहिर्जे- ८३७८९८०९८७ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १२८/२०२४ भादवि ३०४(अ),२७९,३३७,३३८,४२७ व मो.वा. अधि काक १९८८ चे १८४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०५/०३/२०२४ रोजी सकाळी ०८.२० वा च्या सुमारास K.C आईस्क्रीम पार्लर दुकानासमोर हायवे रोडवर शिवाजी नगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०५/०३/२०२४ रोजी १४.०४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | दत्तात्रय दगडू माने,वय-६० वर्षे,रा- प्लॉट नं १५,गुलमोहर हाऊसिंग सोसायटी शिवाजी नगर बाळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | एमएच २५ ए जे ४९२१ चा चालक |
| **मयताचे नाव** | | दिपक दत्तात्रय माने वय-३८ रा-प्लॉट नं १५,गुलमोहर हाऊसिंग सोसायटी शिवाजी नगर बाळे सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०५/०३/२०२४ रोजी सकाळी ०८.२० वा च्या सुमारास K.C आईस्क्रीम पार्लर दुकानासमोर हायवे रोडवर शिवाजी नगर सोलापूर येथे फिर्यादीचा मुलगा यातील मयत व एक अनोळखी महिला ही रोडच्या कडेला कामाला जाण्यासाठी उभे असताना सोलापूरकडून पुणेच्या दिशेने जाणारी एक पांढऱ्या रंगाची महिंद्रा बोलेरो गाडी नं एमएच २५ ए.जे ४९२१ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील सदरचे वाहन हयगयीने निष्काळजीपणे व अतिवेगाने चालवून फिर्यादीचा मुलगा यातील मयत व एक अनोळखी महिला यांना जोरात धडक देवून त्यांच्या व स्वत:च्या दुखापतीस व दिपक माने यांच्या मृत्युस व वाहनाचे नुकसानीस कारणीभूत झाले आहे.म्हणून.तपास- सपोनि बनसवडे- **७८४३०९३७०६** |